“महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई
सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद”
योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.

सन २०२३-२४ करिता (लेखाशिर्ष (४२१७ ०५४१) अंतर्गत
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, जि. पुणे
रक्कम रू. १०.०० कोटी

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:-मनपा-२०२३/प्र.क्र.३२८(२७)/ नवि-१६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक ०४ ऑगस्ट, २०२३

संदर्भ :-

(१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. धोरण-२०१७/प्र.क्र.९६/नवि-१६, दि. १२ डिसेंबर,२०१७, दि. ३० सप्टेंबर,२०२० व दि. २४ एप्रिल, २०२३

(२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.१२ एप्रिल,२०२३

प्रस्तावना :-

राज्यातील महानगरपालिकांना मुलभुत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन क्रमांक (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने कामांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

**“महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासाठी विशेष तरतूद”** या योजनेंतर्गत **“पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, जि. पुणे”** यांना **सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील कामांकरिता रक्कम रु. १०,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. दहा कोटी फक्त)** इतका निधी वितरीत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्पाअंतर्गत सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील अ.क्र. १ ते ६५ मधील कामांकरिता कार्यान्वयन यंत्रणा **“सार्वजनिक बांधकाम विभाग”** राहील. तसेच अ.क्र. ६६ व ६७ मधील कामांकरिता कार्यान्वयन यंत्रणा **“जिल्हा क्रिडा अधिकारी”** राहील.

३. सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहील. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना प्रकल्प खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी व संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी.

४. सदर शासन निर्णयानुसार प्रत्येक कामाच्या रक्कम रू. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीस मान्यता देण्यात आली आहे.सबब, तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रत्येक कामाच्या रक्कम

रू. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीच्या प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात करण्यात यावी. एखाद्या कामाची तांत्रिक मान्यता कमी किंमतीची (रू. १० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) असल्यास सदर कामे एकत्रित करून प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात यावी. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची (Package) ई-निविदा करणे अपेक्षित आहे. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई-निविदेने करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या (Package) रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व:उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरूक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

६. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

७. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. प्रत्येक काम किमान रू.१० लक्ष किंमतीचे राहील याची दक्षता घेण्यात यावी.

८. जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे व निधी आहरीत करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.अशी बाब असल्यास सदरचा निधी आहरीत करू नये.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर योजनेअंतर्गत करण्यात येणा-या रस्त्यांच्या कामांना इतर कोणत्याही योजनेमधून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही अथवा सदरची कामे करण्यात आलेली नाही याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

९. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

१०. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

११. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ करीता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

१२. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता जिल्हाधिकारी, पुणे यांना नियंत्रक अधिकारी तसेच जिल्हा प्रशासन अधिकारी, पुणे यांना यापुढे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, पुणे / जिल्हा प्रशासन अधिकारी, पुणे यांनी सदरचा निधी कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

१३. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासाठी विशेष तरतूद" या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तींची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

१४. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ करिता वितरीत कलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१५. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षण / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकाऱ्याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करुन नये.

१६. सदरचे अनुदान दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

१७. राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ कार्यान्वयन यंत्रणा यांना कोणत्याही प्रकारची कपात न करता वितरीत करण्यात यावा.

१८. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-११९८/प्र.क्र.३०/न.वि.-०४, दिनांक १२ मार्च,२०१८, दिनांक ४ जून, २०१८, दिनांक ९ ऑगस्ट,२०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दि.०१ जून, २०१९,दि.२६ फेब्रुवारी,२०२०, दि.११ जुन,२०२०,दि.२१ मे,२०२१, दि. २८ मार्च,२०२२ व दि. २८ एप्रिल, २०२३ अन्वये कार्यवाही करावी.

१९. यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-५, मुख्य लेखाशिर्ष ४२१७, नगर विकासावरील भांडवली खर्च, ८०, सर्वसाधारण,१९१, स्थानिक संस्था,महानगरपालिका, नगर विकास प्राधिकरणे, शहर सुधार मंडळे, इत्यादींना सहाय्य, (००) (०२) महागनरपालिका क्षेत्रात मुलभूत सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद (कार्यक्रम), (४२१७ ०५४१), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

२०. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. १२ एप्रिल, २०२३ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे.सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अ.क्र.९ मधील तपासणीसुचीतील अ.क्र.१ ते १० मधील लागू असलेल्या अटी व शर्तींची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे.

२१. संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्थी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

04/08/23

**(श्रीकांत आंडगे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापुर भवन, ७ वा मजला, नवी मुंबई- ४०० ६१४.
३. विभागीय आयुक्त, पुणे
४. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, जि. पुणे
५. जिल्हाधिकारी, पुणे
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
११. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे
१२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. २, पुणे-११
१३. जिल्हा क्रिडा अधिकारी, पुणे
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

१५. जिल्हा प्रशासन अधिकारी, पुणे

१६. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७. कार्यासन नवि-४, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१८. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

## शासन निर्णय क्रमांक:-मनपा-२०२३/प्र.क्र.३२८(२७)/नवि-१६
## दिनांक ०४ ऑगस्ट, २०२३ सोबतचे विवरणपत्र
## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, जि. पुणे क्षेत्रातील कामे

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| १ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत काळेवाडी मेन रोड कोकणे नगर मधील श्री कृष्णा कॉलनी क्र.१,२,साई पार्क कॉलनी, नढे नगर , पवना चौक ते राधाकृष्णा मंदिर रोड, गीता बिअरबार ते राधाकृष्ण मन्दिर, शांती कॉलनी, इंद्रप्रस्थ कॉलनी, साईनाथ कॉलनी, ज्योतिबा नगर, गजराज कॉलनी, अश्विनी कॉलनी, संत ज्ञानेश्वर कॉलनी, आदर्श नगर, गणराज कॉलनी, गोकुळवाडा, विजय नगर , सत्संग रोड, परिसरातील अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | ४०.०० |
| २ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत किवळे परिसरातील अंतर्गत गल्ली बोळ, रस्ते डांबरीकरण करणे. | ३०.०० |
| ३ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत रावेत परिसरातील अंतर्गत गल्ली बोळ, रस्ते डांबरीकरण करणे. | ३०.०० |
| ४ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत मामुर्डी परिसरातील अंतर्गत गल्ली बोळ, रस्ते डांबरीकरण करणे. | ३०.०० |
| ५ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाकड येथील संत तुकाराम गार्डन, विनोदे वस्ती, हिंजवडी लक्ष्मी चौक,वाकड काळाखडक, विनोदे नगर, अक्षरा स्कूल,अल्हाट वस्ती परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ३०.०० |
| ६ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत थेरगाव येथील पवार नगर परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| ७ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत थेरगाव येथील पडवळ नगर परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| ८ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत थेरगाव येथील शिवतीर्थ नगर परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| ९ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत थेरगाव येथील जय मल्हार नगर, गुरुनानक नगर, बोर्डे नगर परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| १० | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत थेरगाव येथील थेरगाव गावठाण, गुजर नगर बी.आर.टी रोड परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| ११ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत थेरगाव येथील | १०.०० |

०४/०८/२३

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| | जगताप नगर, शरद नागरी पतसंस्थामागील परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | |
| १२ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत थेरगाव येथील जगताप नगर ते डी मार्ट रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १०.०० |
| १३ | चिंचवड मतदार संघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पुनावळे येथील गायकवाड नगर ते कोयते वस्ती-<br>अक्षरा इंटरनॅशनल स्कूल ते सिल्व्हर स्पून , कोयते वस्ती ते लोटस बिजनेस स्कूल पर्यंतचा रस्ता , कोयते वस्ती ते लोटस बिजनेस स्कूल, भूमकर चौक, भुजबळ कॉर्नर कस्तुरी चौक परिसरातील रस्ता रस्ते डांबरीकरण करणे. | ४०.०० |
| १४ | चिंचवड मतदार संघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पुनावळे येथे अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| १५ | चिंचवड मतदार संघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पुनावळे, पांढरे वस्ती स.नं.१४ व १५ लक्ष्मी चौक ते स्टांझा सोसायटी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | २०.०० |
| १६ | चिंचवड मतदार संघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत भूमकर चौक जवळ इंदिरा कॉलेज ते व्हिझन एस सोसायटी परिसरातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १०.०० |
| १७ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्र.क्र.२२ येथील ओमकार कॉलनी, नढेनगर परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | १०.०० |
| १८ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत काळेवाडी येथील संत निरंकारी भवन रोड आझाद ट्रेडर्स शेजारी विजयनगर, परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| १९ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पंचनाथ चौक ते जीवन चौक परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| २० | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत फिनोलेक्स कॉलनी पूर्वेकडील भाग ते ज्योतिबानगर परिसरातील अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| २१ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाल्हेकरवाडी येथील श्रीकृष्ण कॉलनी, सायली कॉम्प्लेक्स परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| २२ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाल्हेकरवाडी येथील भोंडवे वस्ती कॉलनी नं.१, परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |

04/08/23

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| २३ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत कृष्णकुंज को-ऑप हौ. सोसायटी स.नं.१३०/२, सी.टी.एस.नं.२४४८P व २४४९P, जिजामाता चौक, गुरुद्वारा - वाल्हेकरवाडी परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | २०.०० |
| २४ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत सुदर्शन नगर येथील सिंहगड कॉलनी, ऋतुराज कॉलनी परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| २५ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाकड येथील पिंक सिटी परिसर अंतर्गत सोसायटीमधील रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| २६ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत समीर भुजबळ चौक ते पुनावळे हायवे चौक परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | २०.०० |
| २७ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पिंपळे सौदागर कुणाल आयकॉन रोड परिसरातील अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे. | १०.०० |
| २८ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाकड येथील सोनाई मंगल कार्यालय मागील परिसर परिसरातील अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| २९ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत रहाटणी सर्व्हे.नं. ४३ येथील ९५० मी १८ डी.पी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| ३० | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पिंपळे निलख येथील सम्राट कॉलनी, पंचशील नगर व पिंपळे निलख परिसरातील अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| ३१ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ह क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत जुनी सांगवी येथील गल्ली बोळ, रस्ते डांबरीकरण करणे. | २०.०० |
| ३२ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ह क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत मधुबन सोसायटी सांगवी येथील १२ मी रस्ता व शितोळे नगर ते मधुबन सोसायटी सांगवी रस्ता क्र.१० , मुळा नगर, सांगवी १८ मीटर डी.पी. रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| ३३ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाकड येथील कल्पतरू हार्मोनी समोरील रस्ता, ग्रीन व्हॅली सोसायटी ते मानकर चौक मुख्य रस्ता डांबरीकरण करणे. | २०.०० |
| ३४ | जिल्हा रुग्णालय औंध ,पुणे अंतर्गत परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| ३५ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. २४ मधील स.नं.२७ येथील यशोदा आंगण सोसायटी शेजारील HCMTR अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १०.०० |

०४/०८/२३

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| ३६ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाकड भुजबळ वस्ती टीपटॉप इंटरनॅशनल हॉटेल मागील भुजबळ वस्तीकडे जाणारा सिगनम सोसायटी जवळील रस्ता करणे. | १०.०० |
| ३७ | चिंचवड विधानसभा मतदारसंघातील ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत थेरगाव येथील गुजर नगर बीआरटी रोड ते दिगंबर गुजर ऑफिस लाईन येथे जुन्या जीर्ण झालेल्या ड्रेनेजलाईन बदलून मोठ्या व्यासाच्या नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | १०.०० |
| ३८ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत थेरगाव येथील पवार नगर कॉलनी क्रमांक आठ बजरंग पवार कॉलनी परिसरात पावसाळी गटर लाईन टाकणे. | १०.०० |
| ३९ | चिंचवड विधानसभा मतदारसंघातील ह क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत नवी सांगवी पिंपळे गुरव सर्व्हे नंबर ५६ बोरा हॉस्पिटल रोड कवडेनगर परिसरात पावसाळी गटर लाईन टाकणे. | १०.०० |
| ४० | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाल्हेकरवाडी येथील पाण्याच्या टाकीमागील परिसरात नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | १०.०० |
| ४१ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत किवळे विकासनगर परिसरात नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | १०.०० |
| ४२ | चिंचवड विधानसभा मतदारसंघातील ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत चिंचवड येथील भिमनगर, लोंढे नगर येथे जुन्या जीर्ण झालेल्या ड्रेनेज लाईन बदलून मोठ्या व्यासाच्या नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २५.०० |
| ४३ | चिंचवड विधानसभा मतदारसंघातील ह क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत नवी सांगवी पिंपळे गुरव सर्व्हे नंबर ५६ बोरा हॉस्पिटल रोड कवडेनगर परिसरात जलनि:सारण लाईन टाकणे | १०.०० |
| ४४ | चिंचवड मतदारसंघातील ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाकड येथील कॉस्टा रिका सोसायटी दत्त मंदिर रोड ते पिंक सिटी रोड जल:णीसारण लाईन टाकणे. | २५.०० |
| ४५ | चिंचवड मतदारसंघातील ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२२ नढे नगर मधील ज्योतिबा नगर मधील आझाद कॉलनी क्र. १,२ व ३, अश्विनी कॉलनी, नढे नगर मधील साईनाथ कॉलनी, इंडियन कॉलनी , महाराष्ट्र कॉलनी,भारत कॉलनी परिसरात पावसाळी गटर लाईन टाकणे . | २५.०० |
| ४६ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत रहाटणी सर्व्हे.नं. ४३ येथील ९५० मी १८ डी.पी रोड परिसरात नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | १०.०० |

०४/०८/२३

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| ४७ | चिंचवड मतदारसंघातील ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२२ नढे नगर मधील गुरुकृपा कॉलनी , संघर्ष कॉलनी , शांती कॉलनी, ज्योतिबा नगर मधील चंद्रकिरण कॉलनी, राजवाडे नगर मधील जयहिंद कॉलनी, परमवीर कॉलनी परिसरात नवीन ६ इंची, ८ इंची, १० इंची ड्रेनेज लाईन टाकणे. | २०.०० |
| ४८ | चिंचवड मतदारसंघातील ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२२ नढे नगर मधील सहयोग कॉलनी , स्वराज कॉलनी, ओमकार कॉलनी, विजयनगर, वैभव कॉलनी, शांती कॉलनी, सुयोग कॉलनी येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेकरिता मोठ्या व्यासाची पाईपलाईन टाकणे. | १५.०० |
| ४९ | चिंचवड मतदारसंघातील पिं-चिं मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत किवळे,रावेत,मामुर्डी, विकासनगर, बिजलीनगर, शिवनगरी, प्रेमलोकपार्क, विजयनगर, चिंचवडगाव अंतर्गत परिसरातील रस्त्याला फुटपाथ विकसित करणे. | २०.०० |
| ५० | चिंचवड मतदारसंघातील पिं-चिं मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत थेरगाव गावठाण, पडवळनगर भाग, अशोका सोसायटी, साईनाथनगर, समर्थ कॉलनी, दत्तनगर, पद्मजी पेपरमिल, गणेशनगर, म्हातोबानगर, क्रांतीनगर, महाराष्ट्र कॉलनी, यशदा कॉलनी, गुजरनगर, मंगलनगर, बेलठिकानगर भाग, तापकीरनगर, श्रीनगर, शिवतीर्थनगर, बळिराम गार्डन, रहाटणी गावठाण, अंतर्गत परिसरातील रस्त्याला फुटपाथ विकसित करणे. | २०.०० |
| ५१ | चिंचवड मतदारसंघातील पिं-चिं मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत माळवडी, पुनावळे, पांढरे वस्ती, काटे वस्ती, नवले वस्ती, अशोकानगर, निंबाळकरनगर, भुमकरवस्ती, वाकड काळ-खडक, मुंबोजानगर, मानेवस्ती, भुजबळ वस्ती, वाकडकर वस्ती, केमसे वस्ती, पिंपळे निलख, विशालनगर, कस्पटेवस्ती, दत्तमंदिर परिसर, अण्णाभाऊ साठेनगर, वेणुनगर भाग, रक्षक सोसायटी, रामनगर, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, सुदर्शन नगर, वैदुवस्ती, जवळकरनगर, भालेकरनगर अंतर्गत परिसरातील रस्त्याला फुटपाथ विकसित करणे. | २०.०० |
| ५२ | चिंचवड मतदारसंघातील पिं-चिं मनपाच्या ह क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत राजीव गांधीनगर, गजानन महाराज नगर, किर्ती नगर, विनायकनगर, गणेशनगर, कवडेनगर, गांगार्डेनगर , विद्यानगर, सांगवी गावठाण, मधुबन सोसायटी, ढोरेनगर, जयमालानगर, एस.टी.कॉलनी, कृष्णानगर, शिवदत्तनगर, अंतर्गत परिसरातील रस्त्याला फुटपाथ विकसित करणे | २०.०० |
| ५३ | चिंचवड मतदारसंघातील विविध ठिकाणच्या झाडांना दगडी पार बांधणे. | १०.०० |

०४/०८/२३

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| ५४ | चिंचवड मतदारसंघातील कस्पटे वस्ती येथील कै. मारुती गेनू कस्पटे प्राथमिक शाळा क्र ५९ येथे वरच्या मजल्या वरती बहुद्देशीय हॉल बांधणे. | २५.०० |
| ५५ | चिंचवड मतदारसंघातील मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत रहाटणी येथील शंकर मंदिर परिसरात दगडी फरशी व दगडी पार बांधणे व तदनुषंगिक कामे करणे. | १०.०० |
| ५६ | चिंचवड मतदारसंघातील ह क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत जुनी सांगवी येथील छत्रपती शिवाजी गार्डन मधुबन कॉलनी येथे व्यायाम शाळा बांधणे. | १०.०० |
| ५७ | चिंचवड मतदारसंघातील ह क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत जुनी सांगवी येथील छत्रपती शिवाजी गार्डन मधुबन कॉलनी येथे योगा हॉल बांधणे. | १०.०० |
| ५८ | चिंचवड मतदारसंघातील पिंपरी-चिंचवड मनपाच्या -ब॰ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विविध ठिकाणी सौर ऊर्जेचे दिवे बसविणे. | १०.०० |
| ५९ | चिंचवड मतदारसंघातील पिंपरी-चिंचवड मनपाच्या -ग॰ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विविध ठिकाणी सौर ऊर्जेचे दिवे बसविणे. | १०.०० |
| ६० | चिंचवड मतदारसंघातील पिंपरी-चिंचवड मनपाच्या -ड॰ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विविध ठिकाणी सौर ऊर्जेचे दिवे बसविणे. | १०.०० |
| ६१ | चिंचवड मतदारसंघातील पिंपरी-चिंचवड मनपाच्या -ह॰ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विविध ठिकाणी सौर ऊर्जेचे दिवे बसविणे . | १०.०० |
| ६२ | चिंचवड मतदारसंघात रावेत पोलीस स्टेशन हद्दीत सी सी टी व्ही कॅमेरे बसविणे. | ३०.०० |
| ६३ | चिंचवड मतदारसंघात काळेवाडी पोलीस स्टेशन हद्दीत सी सी टी व्ही कॅमेरे बसविणे. | |
| ६४ | चिंचवड मतदारसंघात वाकड पोलीस स्टेशन हद्दीत सी सी टी व्ही कॅमेरे बसविणे. | |
| ६५ | चिंचवड मतदारसंघात सांगवी पोलीस स्टेशन हद्दीत सी सी टी व्ही कॅमेरे बसविणे. | |
| ६६ | चिंचवड मतदारसंघातील उद्याने विकसित करणे व लहान मुलांकरिता खेळणी बसविणे. | २०.०० |
| ६७ | चिंचवड मतदारसंघात विविध ठिकाणी रस्त्यालगतच्या परिसरात ओपन जिमचे साहित्य बसविणे. | ३५.०० |
| | **एकूण रक्कम रु. (लक्ष)** | **१०००.००** |